सत्यमेव जयते
**महाराष्ट्र शासन**
**पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य**
**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१**

क्र. पोमसं /३६/ र.व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०७/२०२५, मुंबई, दिनांक ई-स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ** :- महाराष्ट्र शासन, गृह विभाग, निर्णय क्र. पीईक्यू-०११६/प्र.क्र.३३१/पोल-४, दि. ०१/०७/२०२५.

**विषय** :- गृह विभाग व अधिनस्त कार्यालयांसाठी आवश्यक सर्व प्रकारच्या खरेदीसाठी प्रशासकीय विभाग स्तरावरील कार्यपध्दती निश्चित करणेबाबत.

*****

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, निर्णय क्र. पीईक्यू-०११६/प्र.क्र.३३१/पोल-४, दि. ०१/०७/२०२५ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२५०७०११४३४५८८०२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Signed by
Pravin Madhukar Shikhare
Date: 02-07-2025 22:37:03

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह).
सर्व पोलीस आयुक्त (बृहन्मुंबई वगळून).
अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व विशेष पोलीस महानिरीक्षक/ पोलीस उप महानिरीक्षक .
सर्व पोलीस अधीक्षक (गुन्हे / बिनतारी संदेश / लोहमार्ग सह).
पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, सुराबर्डी, अमरावती रोड, नागपूर.
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१ ते १९.
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक(लेखा/पुर्नरचना).
सहायक संचालक (वित्त व लेखा), पोलीस महासंचालक कार्यालय,महाराष्ट्र राज्य, मुंबई.
कार्यासन अधिकारी, का क्र.१ ते ४४.

प्रत,

अपर पोलीस महासंचालक (नि. व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सहायक पोलीस महानिरीक्षक (नि. व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत :-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके “सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**गृह विभाग व अधीनस्त कार्यालयांसाठी आवश्यक सर्व प्रकारच्या खरेदीसाठी प्रशासकीय विभाग स्तरावरील कार्यपध्दती निश्चित करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: पीईक्यू-०११६/प्र.क्र.३३१/पोल-४**
**(H.D.-13011/40/2025-POL4-MHD-Home Department)**
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२**
**दिनांक :- ०१ जुलै, २०२५**

**संदर्भ :** १) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र.भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-४, दि.०१.१२.२०१६ अन्वये निर्गमित शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची सुधारीत नियमपुस्तिका

२) गृह विभाग, शासन निर्णय, क्रमांक पीईक्यू-०११६/प्र.क्र.३३१/पोल-४, दि.३१.०७.२०१९

३) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२, दि.१७.०४.२०१५

**प्रस्तावना :-**

उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने दि.०१.१२.२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये शासकीय विभागाने करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची सुधारीत नियम पुस्तिका तयार करुन खरेदीविषयक कार्यपध्दती राज्यात लागू करण्यात आली आहे.

सदर शासन निर्णयामधील तरतुदीस अनुसरुन, गृह विभागाच्या संदर्भ क्र.२ येथील दि.३१.०७.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये अत्यंत तातडीच्या खरेदीसाठी शासन स्तरावर उच्चाधिकार समिती, राज्यस्तरीय प्रशासकीय विभाग खरेदी समिती, विभागीय स्तरावरील खरेदी समिती, जिल्हा स्तरीय खरेदी समिती, इत्यादी समित्या गठीत करण्यात आलेल्या आहेत.

गृह विभागाच्या अधीनस्त पोलीस विभाग, तुरुंग विभाग, गृह रक्षक दल, राज्य राखीव पोलीस दल, न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय, अभियोग संचालनालय, इ. सर्व कार्यालयाकडील खरेदी प्रस्तावांमधील बहुतांश वस्तु, उपकरणे, यंत्रसामग्री व साधनसामग्री यामध्ये तांत्रिक बाबींचा समावेश असतो. त्यानुषंगाने, पोलीस महासंचालक, पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, महासंचालक(न्यायिक व तांत्रिक), महासमादेशक (राज्य राखीव पोलीस बल), अप्पर पोलीस महासंचालक तथा महानिरीक्षक (कारागृह व सुधार सेवा), सायबर सुरक्षा महामंडळ इ. विभाग प्रमुखांमार्फत, खरेदी प्रस्ताव प्रशासकीय विभागाकडे प्रशासकीय मान्यतेसाठी पाठविण्यात येतात.

गृह विभागाच्या अधीनस्त सर्व कार्यालयांकडुन शासनस्तरावर प्रशासकीय मान्यतेस्तव प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांमध्ये खरेदीविषयक बाबींची प्रशासकीय, वित्तीय व तांत्रिक या पातळीवरील सखोल तपासणी होऊन खरेदीविषयक प्रस्तावांना विभागस्तरावर प्रशासकीय मान्यता देणे आवश्यक असते. म्हणून खरेदीविषयक प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता देताना सुसुत्रता आणण्यासाठी कार्यपध्दती निश्चित करण्याची तसेच विविध स्तरावरील खरेदी समित्यांचे पुनर्गठन करण्याची बाब गृह विभागाच्या विचाराधीन होती. त्यानुसार खालीलप्रमाणे शासन निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय** :-

**१.** संदर्भ क्र. २ येथील दि. ३१.०७.२०१९ रोजीचा शासन निर्णय या शासन निर्णयाद्वारे अधिक्रमित करण्यात येत आहे.

**२.** संदर्भ क्र.१ येथील नियमपुस्तिकेमधील खरेदी धोरणाप्रमाणे, राज्य स्तरीय प्रशासकीय मान्यता समिती, राज्य स्तरीय उच्चाधिकार समिती, गृह विभाग खरेदी समिती, विभागीय स्तरावरील खरेदी समिती (पोलीस विभाग, गृह रक्षक दल व नागरी संरक्षण दल, न्याय सहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय व अन्य), आणि जिल्हा स्तरावरील खरेदी समिती यांची रचना व वित्तीय मर्यादा सुधारित करुन पुनर्गठित करण्यास या शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

**३.** **<u>प्रशासकीय मान्यतेची कार्यपध्दती :-</u>**

गृह विभागाच्या अधिनस्त सर्व कार्यालयांकडुन विहित मार्गाने शासन स्तरावर प्रशासकीय मान्यतेस्तव प्रस्ताव सादर करताना या शासन निर्णयाद्वारे खालीलप्रमाणे कार्यपध्दती निश्चित करण्यात येत आहे.

i. **<u>खरेदीची गरज व आवश्यकता तपासणे :-</u>** क्षेत्रीय कार्यालयाने मागणी केलेल्या खरेदीविषयक वस्तु, सेवा, यंत्रसामग्री/साधनसामग्री यांची आवश्यकता व उपयुक्तता, संबंधित **यंत्रणांचे घोषित** विभाग प्रमुखांनी प्रमाणित करावी व प्रशासकीय विभागास प्रस्ताव सादर करावा. (खरेदी नियम पुस्तिकेमधील ३.१ व ३.१.१, ३.१.१.१ ते ३.१.१.२)

ii. **<u>किंमतीचा वाजवीपणा तपासणे :-</u>** क्षेत्रीय कार्यालयाने मागणी केलेल्या खरेदीविषयक वस्तु, सेवा, यंत्रसामग्री/साधनसामग्री यांच्या किंमतीचा वाजवीपणा संबंधित विभाग प्रमुखांनी तपासुन प्रमाणित करावा. (खरेदी नियम पुस्तिकेमधील ३.१.२.१ ते ३.१.२.११)

iii. **<u>तांत्रिक विनिर्देशांची तपासणी :-</u>** क्षेत्रीय कार्यालयाने मागणी केलेल्या वस्तु, सेवा,

यंत्रसामग्री/साधनसामग्री यांच्या तांत्रिक विनिर्देशांची निश्चिती व पडताळणी **संबंधित तांत्रिक समितीने करुन, तांत्रिक विनिर्देशासह** विभाग प्रमुखांनी सादर करावी. **विभाग प्रमुखांनी तपासणी व प्रमाणित करुनच** शासनास प्रस्ताव सादर करावेत. तांत्रिक विनिर्देशाची निश्चिती करताना सर्वोच्चतम व किफायतशीर तंत्रज्ञानास प्राधान्य देण्यात यावे.(खरेदी नियम पुस्तिकेमधील २.९.२)

iv. **शासकीय पोर्टल / GeM :-** खरेदीसाठी शासकीय पोर्टल/GeM (Government-e Market Place) चा जास्तीत जास्त वापर करावा. Govt. Portal/GeM च्या किंमती बाजारभावाशी तुलना कराव्यात. **जर सारख्याच गुणवत्तेची वस्तु बाजारात कमी भावाने उपलब्ध असेल तर संबंधीत पुरवठादारास GeM पोर्टल वर नोंदणी करण्याबाबत सुचीत करावे.**

v. **एकलस्त्रोत पध्दतीने खरेदी :-** केवळ अपवादात्मक परिस्थितीत खरेदी करावयाची वस्तु एकलस्त्रोताकडून खरेदी करणे आवश्यक असल्यास, संदर्भ क्र.१ मधील नियम ३.२.६ **प्रमाणे कार्यवाही करावी.** संबंधित विभाग प्रमुखाने संदर्भ क्र. १ वरील शासन निर्णयामधील परिशिष्ठ-१३ नुसार विहित नमुन्यात प्रमाणित करुनच शासन मंजुरीसाठी प्रस्ताव सादर करणे आवश्यक राहील. (खरेदी नियम पुस्तिकेमधील ३.२.६)

४. **राज्यस्तरीय प्रशासकीय मान्यता समिती :-**

उपरोक्त कार्यपध्दतीनुसार **या शासन निर्णयासोबत जोडलेल्या विवरणपत्रामधील सर्व मुद्दयांची तपासणी करुनच** आवश्यक ती सर्व कागदपत्रे संलग्न करुन संबंधित विभाग प्रमुखांच्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह परीपुर्ण खरेदी प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी शासनास सादर करण्याची संबंधित विभाग प्रमुखांनी दक्षता घ्यावी. **वरील कार्यपध्दतीनुसार प्राप्त झालेले परिपूर्ण प्रस्तावच खालीलप्रमाणे गठीत राज्यस्तरीय प्रशासकीय मान्यता समितीसमोर सादर करण्यात येतील.**

| | | |
|---|---|---|
| १ | अपर मुख्य सचिव (गृह) किंवा प्रधान सचिव/सचिव (अ. व सु.) (क्षेत्रीय कार्यालयानुसार) | अध्यक्ष |
| २ | पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई/ महासंचालक (न्यायिक व तांत्रिक)/ अप्पर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक(कारागृह व सुधारसेवा) किंवा अन्य संबंधित विभाग प्रमुख, (क्षेत्रीय कार्यालयानुसार) | सदस्य |
| ३ | प्रधान सचिव (विशेष),गृह विभाग,मंत्रालय,मुंबई | सदस्य |
| ४ | आयुक्त (विकास), उद्योग विभाग किंवा उद्योग संचालनालयाचा उद्योग सहसंचालक दर्जापेक्षा कमी नसलेला प्रतिनिधी | निमंत्रित |
| ५ | वित्त विभागाचे सह/उप सचिव | निमंत्रित |

| | | |
|---|---|---|
| ६ | नियोजन विभागाचे सह/उप सचिव | निमंत्रित |
| ७ | अन्य विभागांकडून (जसे, माहिती तंत्रज्ञान विभाग) कोणताही आवश्यकता असल्यास | निमंत्रित निमंत्रित |
| ८ | संबंधित सह सचिव/उप सचिव, गृह विभाग | सदस्य-सचिव |

सदर समितीस गृह विभागाच्या अधिपत्याखालील सर्व क्षेत्रीय घटक कार्यालयांकरिता आवश्यक असलेल्या संपूर्ण खरेदीसाठी मान्यता देण्याचे अधिकार राहतील.

५. **वित्तीय मर्यादा :-** राज्य स्तरीय प्रशासकीय मान्यता समितीच्या बैठकीमधील निर्णयानुसार, वित्तीय अधिकार मर्यादेस अनुसरुन, सक्षम स्तरावर तसेच ज्या प्रकरणी खरेदीचे मुल्य रु.५.०० कोटी पेक्षा जास्त असेल तर अनिवार्य खर्चाबाबत वित्त विभागाची मान्यता घेण्यात येईल. तसेच कार्यक्रम खर्चाबाबत नियोजन व वित्त विभागाच्या मंजुरीनंतर, प्रशासकीय मान्यतेचे आदेश प्रशासकीय विभागस्तरावरुन निर्गमित करण्यात यावेत.

६. **नवीन योजना व प्रकल्पासाठीची खरेदी :-** नवीन प्रकल्प, नवीन योजना तसेच गृह विभागाच्या अधिपत्याखालील क्षेत्रीय यंत्रणेचे आधुनिकीकरण अंतर्गत खरेदी प्रस्तावित करण्यापुर्वी अशा प्रकल्प/योजनेस सक्षम स्तरावर, म्हणजे मा. मंत्री(गृह) / मा. मंत्रीमंडळाची मान्यता घेणे आवश्यक राहील.

७. **प्रशासकीय मान्यतेनंतर प्रत्यक्ष खरेदी प्रक्रियेसाठी विविध खरेदी समित्यांची रचना व वित्तीय मर्यादा खालीलप्रमाणे राहील :-**

७ अ) **राज्य स्तरीय उच्चाधिकार समिती:- (केवळ रु. १.०० कोटी व त्यावरील अत्यंत तातडीच्या खरेदीसाठी) :-**

राज्य पोलीस दल, बृहन्मुंबई पोलीस दल, गृहरक्षक दल, राज्य राखीव पोलीस बल, कारागृह व सुधार सेवा, अभियोग संचालनालय, न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय व अन्य विभागांसाठी खरेदी करावयाच्या उपकरणांच्या/साधनसामुग्रीच्या अनुषंगाने अत्यंत तातडीची खरेदी, मर्यादित निविदा/निर्बंधित निविदा, स्विस चॅलेंज, इत्यादी पध्दतीच्या खरेदीसाठी एक उच्चस्तरीय खरेदी समिती नेमण्यात येत आहे. सदर समितीची रचना खालीलप्रमाणे राहील.

| | | |
|---|---|---|
| १ | अपर मुख्य सचिव (गृह)/प्रधान सचिव/सचिव (अ. व सु.) | अध्यक्ष |
| २ | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (वित्त विभाग) | सदस्य |
| ३ | प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग | सदस्य |
| ४ | विकास आयुक्त (उद्योग) | सदस्य |
| ५ | संबंधित सह सचिव/उप सचिव, गृह विभाग | सदस्य-सचिव |

या उच्चाधिकार समितीला रु. १.०० कोटी वरील बाबींची तातडीची खरेदी, मर्यादित निविदा, निर्बंधित निविदा, स्विस चॅलेंज अन्वये खरेदी करण्यास मान्यता देण्याचे अधिकार असतील. या समितीने खरेदी करण्यास मान्यता दिल्यानंतर, विभागामार्फत प्रशासकीय मान्यता देवून प्रदान केलेल्या वित्तीय अधिकाराप्रमाणे खरेदी प्रक्रिया राबवावी.

अन्य प्रकरणी वित्त विभागाच्या संदर्भ क्र.३ मध्ये नमुद बाबनिहाय प्रदान केलेल्या वित्तीय अधिकारानुसार खरेदी करण्यात यावी.

**७ ब) <u>राज्यस्तरीय प्रशासकीय विभाग खरेदी समिती :-</u>**

राज्य पोलीस दल, बृहन्मुंबई पोलीस दल, गृहरक्षक दल, राज्य राखीव पोलीस बल, कारागृह व सुधार सेवा, न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय व अन्य विभागांसाठी नियमपुस्तिकेत घालून देण्यात आलेल्या कार्यपध्दतीनुसार खरेदी प्रक्रिया हाती घेण्यासाठी प्रशासकीय विभागांतर्गत खरेदी समिती (डीपीसी/पीसी) गठीत करण्यात येत आहे. सदर समितीची रचना खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | अपर मुख्य सचिव (गृह)/प्रधान सचिव/सचिव (अ. व सु.) (क्षेत्रीय कार्यालयानुसार) | अध्यक्ष |
| २ | पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई/ महासंचालक (न्यायिक व तांत्रिक)/ अप्पर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक(कारागृह व सुधारसेवा) किंवा अन्य संबंधित विभाग प्रमुख | सदस्य |
| ३ | प्रधान सचिव (विशेष),गृह विभाग,मंत्रालय,मुंबई | सदस्य |
| ४ | आयुक्त (विकास), उद्योग विभाग किंवा उद्योग संचालनालयाचा उद्योग सहसंचालक दर्जापेक्षा कमी नसलेला प्रतिनिधी | निमंत्रित |
| ५ | लेखा व कोषागार संचालनालयातील गट-अ किंवा गट- ब (राजपत्रित) दर्जाचा लेखाधिकारी | निमंत्रित |
| ६ | वित्त विभागाचे सह/उप सचिव | निमंत्रित |
| ७ | तांत्रिक तज्ञ, अन्य विभागांकडून (जसे, माहिती व तंत्रज्ञान विभाग) | निमंत्रित |
| ८ | संबंधित सह सचिव/उप सचिव, गृह विभाग | सदस्य-सचिव |

राज्यस्तरीय प्रशासकीय विभाग खरेदी समितीला रु.१.०० कोटी प्रति नग व त्यावरील किंमतीच्या साधनसामग्री/ यंत्रसामग्री खरेदीस मान्यता देण्याचे अधिकार असतील. राज्यस्तरीय खरेदी समितीच्या बैठकीत प्रस्तावाची छाननी होऊन समितीची मान्यता पोलीस महासंचालक व अन्य विभाग प्रमुखांना कळविण्यात येईल.

## ७ क) विभागीय स्तरावरील खरेदी समित्या :-

### i. पोलीस विभागासाठी खरेदी समिती :-

पोलीस महासंचालक यांचे अधिनस्त असलेल्या विविध कार्यालयाकरीता आवश्यक उपकरणे/साधनसामुग्री/साहित्य खरेदीकरीता खालीलप्रमाणे विभागीय खरेदी समिती स्थापन करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई | अध्यक्ष |
| २ | पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई | सदस्य |
| ३ | संबंधित सह सचिव/उपसचिव, गृह विभाग | सदस्य |
| ४ | उद्योग सहसंचालक (भांख)/उद्योग संचालनालयाचा प्रतिनिधी | निमंत्रित |
| ५ | लेखा व कोषागार संचालनालयातील गट-अ किंवा गट- ब (राजपत्रित) दर्जाचा लेखाधिकारी | निमंत्रित |
| ६ | अन्य शासकीय विभागांकडून कोणताही निमंत्रित आवश्यकता असल्यास | निमंत्रित |
| ७ | तांत्रिक तज्ञ, अन्य विभागांकडून (जसे, माहिती व तंत्रज्ञान विभाग) | निमंत्रित |
| ८ | संबंधित घटकांचे खरेदी प्रमुख | सदस्य-सचिव |

सदर समितीच्या बैठकीमध्ये पोलीस विभागाच्या अधिपत्याखालील ज्या विभागाचे खरेदीचे प्रस्ताव असतील (उदा.मोटार परिवहन,बिनतारी संदेश विभाग,फोर्स वन,दहशतवाद विरोधी पथक, राज्य गुप्तवार्ता विभाग, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, इत्यादी), अशा विभागातील सदस्यांनाच बैठकीसाठी निमंत्रित करण्यात यावे.

### ii. गृह रक्षक दल व नागरी संरक्षण दलासाठी खरेदी समिती :-

गृह रक्षक दल व नागरी संरक्षण दल यांच्या अधिनस्त विविध कार्यालयाकरीता आवश्यक उपकरणे/ साधनसामुग्री/ साहित्य खरेदीकरीता खालीलप्रमाणे विभागीय खरेदी समिती स्थापन करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | महासमादेशक, गृह रक्षक दल व नागरी संरक्षण दल, महाराष्ट्र राज्य, मुंबई | अध्यक्ष |
| २ | उप महासमादेशक, गृह रक्षक दल व नागरी संरक्षण दल, महाराष्ट्र राज्य, मुंबई | सदस्य |
| ३ | सह सचिव/उपसचिव, गृह विभाग | सदस्य |
| ४ | उद्योग सहसंचालक (भांख)/उद्योग संचालनालयाचा प्रतिनिधी | निमंत्रित |
| ५ | लेखा व कोषागार संचालनालयातील गट-अ किंवा गट- ब (राजपत्रित) दर्जाचा लेखाधिकारी | निमंत्रित |
| ६ | अन्य शासकीय विभागांकडून कोणताही निमंत्रित आवश्यकता असल्यास | निमंत्रित |
| ७ | तांत्रिक तज्ञ, अन्य विभागांकडून (जसे, माहिती व तंत्रज्ञान विभाग) | निमंत्रित |
| ८ | वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी, गृह रक्षक दल व नागरी संरक्षण दल, महाराष्ट्र राज्य,मुंबई | सदस्य-सचिव |

**iii. न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालयासाठी खरेदी समिती :-**

न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालयासाठी आवश्यक उपकरणे/ साधनसामुग्री/यंत्रसामग्री खरेदी करीता खालीलप्रमाणे विभागीय खरेदी समिती गठीत करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | महासंचालक, (न्यायिक व तांत्रिक) महाराष्ट्र राज्य, मुंबई | अध्यक्ष |
| २ | संचालक, न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय, मुंबई | सदस्य |
| ३ | संबंधित सह सचिव/उपसचिव, गृह विभाग | सदस्य |
| ४ | उद्योग सहसंचालक (भांख)/उद्योग संचालनालयाचा प्रतिनिधी | निमंत्रित |
| ५ | लेखा व कोषागार संचालनालयातील गट-अ किंवा गट- ब (राजपत्रित) दर्जाचा लेखाधिकारी | निमंत्रित |
| ६ | अन्य शासकीय विभागांकडून कोणताही निमंत्रित आवश्यकता असल्यास | निमंत्रित |
| ७ | तांत्रिक तज्ञ, अन्य विभागांकडून (जसे, माहिती व तंत्रज्ञान विभाग) आवश्यकता असल्यास | निमंत्रित |
| ८ | सह संचालक/जेष्ठतम उप संचालक, न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय, मुंबई | सदस्य-सचिव |

**iv. कारागृह व सुधारसेवा विभागासाठी खरेदी समिती :-**

कारागृह व सुधारसेवा विभागासाठी आवश्यक साहित्य/उपकरणे/साधनसामुग्री खरेदीकरीता खालीलप्रमाणे विभागीय खरेदी समिती गठीत करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | अप्पर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक (कारागृह व सुधारसेवा) | अध्यक्ष |
| २ | विशेष पोलीस उप महानिरीक्षक, (कारागृह व सुधारसेवा) | सदस्य |
| ३ | संबंधित खरेदी घटकाचे पोलीस उप महानिरीक्षक, (कारागृह व सुधारसेवा) | सदस्य-सचिव |
| ४ | संबंधित सह सचिव/उपसचिव, गृह विभाग | सदस्य |
| ५ | सहसंचालक/उपसंचालक (उद्योग) किंवा महाव्यवस्थापक (जिल्हा उद्योग केंद्र) | निमंत्रित |
| ६ | लेखा व कोषागार संचालनालयातील गट-अ किंवा गट- ब (राजपत्रित) दर्जाचा लेखाधिकारी | निमंत्रित |
| ७ | अन्य शासकीय विभागांकडून कोणताही निमंत्रित आवश्यकता असल्यास | निमंत्रित |
| ८ | तांत्रिक तज्ञ, अन्य विभागांकडून (जसे, माहिती व तंत्रज्ञान विभाग) आवश्यकता असल्यास | निमंत्रित |

**v. <u>अभियोग संचालनालयासाठी खरेदी समिती :-</u>**

अभियोग संचालनालयासाठी आवश्यक उपकरणे/साधनसामुग्री/यंत्रसामग्री खरेदी करीता खालीलप्रमाणे विभागीय खरेदी समिती गठीत करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | महासंचालक, (न्यायिक व तांत्रिक) महाराष्ट्र राज्य, मुंबई | अध्यक्ष |
| २ | संचालक, अभियोग संचालनालय, मुंबई | सदस्य |
| ३ | संबंधित सह सचिव/उपसचिव, गृह विभाग | सदस्य |
| ४ | उद्योग सहसंचालक (भांख)/उद्योग संचालनालयाचा प्रतिनिधी | निमंत्रित |
| ५ | लेखा व कोषागार संचालनालयातील गट-अ किंवा गट- ब (राजपत्रित) दर्जाचा लेखाधिकारी | निमंत्रित |
| ६ | अन्य शासकीय विभागांकडून कोणताही निमंत्रित आवश्यकता असल्यास | निमंत्रित |
| ७ | तांत्रिक तज्ञ, अन्य विभागांकडून (जसे, माहिती व तंत्रज्ञान विभाग) आवश्यकता असल्यास | निमंत्रित |
| ८ | संबधीत उप संचालक/ सहायक संचालक, अभियोग संचालनालय, मुंबई | सदस्य-सचिव |

सक्षम स्तरावरुन प्रशासकीय मान्यतेचे आदेश प्राप्त झाल्यानंतर विभागीय स्तरावरील सर्व साधनसामुग्री/उपकरणे खरेदी करण्यास मान्यता देण्याचे अधिकार उपरोक्तप्रमाणे गठीत [७ (क) (i) ते (v)] खरेदी समित्यांस राहतील. परंतु, ज्या प्रकरणी खरेदी किंमत रु.१.०० कोटी प्रती नग पेक्षा जास्त असेल, त्या प्रकरणी प्रस्ताव राज्य स्तरीय प्रशासकीय विभाग खरेदी समितीच्या मान्यतेस्तव सादर करणे आवश्यक राहील.

**vi. <u>पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई कार्यालयासाठी खरेदी समिती :-</u>**

| | | |
|---|---|---|
| १ | पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई | अध्यक्ष |
| २ | पोलीस सह आयुक्त (प्रशासन) | सदस्य |
| ३ | संबंधित सह सचिव/उपसचिव, गृह विभाग | सदस्य |
| ४ | उद्योग उपसंचालक (भांख)/उद्योग संचालनालयाचा प्रतिनिधी | निमंत्रित |
| ५ | लेखा व कोषागार संचालनालयातील गट-अ किंवा गट- ब (राजपत्रित) दर्जाचा लेखाधिकारी | निमंत्रित |
| ६ | अन्य शासकीय विभागांकडून कोणताही निमंत्रित आवश्यकता असल्यास | निमंत्रित |
| ७ | तांत्रिक तज्ञ, अन्य विभागांकडून (जसे, माहिती व तंत्रज्ञान विभाग) आवश्यकता असल्यास | निमंत्रित |
| ८ | संबंधित खरेदी विभागाचे पोलीस उपायुक्त | सदस्य-सचिव |

सक्षम स्तरावरुन प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर बृहन्मुंबई पोलीस आयुक्तांच्या अध्यक्षतेखालील खरेदी समितीला एकूण रू.५०.०० लाखापर्यंतची खरेदी करण्यास मान्यता देण्याचे अधिकार असतील. परंतु ज्या प्रकरणी खरेदी किंमत रु.५०.०० लाखापेक्षा जास्त

असेल, त्या प्रकरणी प्रस्ताव सदर शासन निर्णयातील ७ (क) (i) अन्वये गठीत समितीसमोर सादर करणे आवश्यक राहील.

७ ड) **आयुक्तालय/जिल्हास्तरावरील खरेदी समित्या :-**

पोलीस विभागांतर्गत आयुक्तालय/जिल्हास्तरावर खरेदी करावयाची उपकरणे/साधनसामुग्री करीता खालीलप्रमाणे विभागीय खरेदी समिती गठीत करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | पोलीस आयुक्त/पोलीस अधीक्षक/समादेशक | अध्यक्ष |
| २ | महाव्यवस्थापक (जिल्हा उद्योग केंद्र)/प्रतिनिधी | सदस्य |
| ३ | लेखा व कोषागार संचालनालयातील गट-अ किंवा गट- ब (राजपत्रित) दर्जाचा लेखाधिकारी | निमंत्रित |
| ४ | अन्य शासकीय विभागांकडून कोणताही निमंत्रित आवश्यकता असल्यास | निमंत्रित |
| ५ | तांत्रिक तज्ञ, अन्य विभागांकडून (जसे, माहिती व तंत्रज्ञान विभाग) आवश्यकता असल्यास | निमंत्रित |
| ६ | पोलीस आयुक्त/पोलीस अधीक्षक/समादेशक यांचे कार्यालयातील गट-अ दर्जाचा वरिष्ठ पोलीस अधिकारी | सदस्य-सचिव |

सक्षम स्तरावरुन प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर, पोलीस आयुक्तांच्या अध्यक्षतेखालील खरेदी समितीला एकूण रू.३५.०० लाखापर्यंत खरेदी करण्यास मान्यता देण्याचे अधिकार असतील. तर पोलीस अधीक्षक/समादेशक यांच्या अध्यक्षतेखालील खरेदी समितीला एकूण खरेदी मूल्य रू.२०.०० लाखापर्यंत खरेदी करण्यास मान्यता देण्याचे अधिकार असतील.

उक्त किंमत मर्यादेवरील सर्व खरेदी प्रस्ताव एकत्रितपणे संबधीत विभागीय स्तरावरील समितीकडे खरेदी करण्याकरीता पाठविणे बंधनकारक असेल.

८. **कार्यपध्दतीबाबत स्पष्टता :-** संदर्भ क्र.१ वरील खरेदी नियम पुस्तिकेमधील कार्यपध्दतीबाबत अधीक स्पष्टतेसाठी विकास आयुक्त (उद्योग) यांचे मार्गदर्शन घेणे आवश्यक असेल.

९. **शासनास अहवाल सादर करणे :-** गृह विभागाच्या अधीनस्त राज्य पोलीस दलातील विविध खरेदीच्या अनुषंगाने वरीलप्रमाणे गठीत सर्व खरेदी समितीच्या झालेल्या बैठका, त्यामध्ये खरेदीस मान्यता दिलेल्या बाबी व त्यावरील खर्च याचा तपशील पोलीस महासंचालक, गृह रक्षक दल व नागरी संरक्षण दल आणि न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय, कारागृह व सुधारसेवा, अभियोग संचालनालय इ., विभागांच्या विभाग प्रमुखांनी शासनास सादर करावा.

प्रशासकीय मान्यतेनंतर सर्व खरेदी समित्यांनी वाजवी मुदतीत खरेदी प्रक्रिया पूर्ण करावी. तसेच प्रत्यक्ष खरेदी झाल्यानंतर, जड वस्तु संग्रह नोंदवही (Dead Stock Register) मध्ये नोंद करुन, कीट कमिटी अहवाल व सर्व बाबींची पूर्तता करुन निधी मागणीचा प्रस्ताव शासनास सादर करावा. शासनाकडुन निधी प्राप्त झाल्यानंतर, वितरीत निधीचे उपयोगिता प्रमाणपत्रे शासनास तातडीने सादर करावीत.

१०. **संक्षिप्त देयकांवरील खरेदी :-** अनेक वेळेला विभागांद्वारे संक्षिप्त देयकांद्वारे खर्च करण्यात येतो. मात्र त्याचे तपशीलवार देयक सादर न केल्यामुळे, लेखा आक्षेप येतात व अपहार संभवतात. यास्तव, वित्त विभागाच्या स्थायी निर्देशानुसार संक्षिप्त देयकांवर खरेदी करण्यात आलेली असेल अशा प्रकरणाची तपशीलवार देयके, एक महिन्याच्या आत, मा. महालेखापाल कार्यालयास तसेच शासनास सादर करण्याची दक्षता घेण्यात यावी. तसेच विभाग प्रमुखांनी ज्या लेखाशीर्षाखाली जुनी तपशीलवार देयके प्रलंबित असतील, ती सादर केल्याशिवाय त्या लेखाशीर्षाखालील निधी, वित्त विभागाच्या सहमतीशिवाय आहरीत करु नये.

११. उपरोक्त कार्यपध्दती गृह विभागाच्या अधीनस्त सर्व कार्यालये तसेच गृह विभाग (खुद्द) यांनादेखील लागु राहील.

१२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२५०७०११४३४५८८०२९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

IQBAL SINGH CHAHAL

Digitally signed by IQBAL SINGH CHAHAL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT,
2.5.4.20=4693065dc6b0f1adab446e59c0657dc1f7d32e83285bc2f58ce129f739c3ce3c, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=234E13A0023CA3F6CD51E31FF2129CB01762B1F6247B20869561B939AE2AEF51, cn=IQBAL SINGH CHAHAL
Date: 2025.07.01 14:35:42 +05'30'

**( इक्बाल सिंग चहल )**
**अप्पर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

१. मा. मुख्यमंत्री (गृह) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा. राज्यमंत्री (गृह) (शहरे / ग्रामीण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. प्रधान सचिव (अ.व सु.),गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
६. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
७. महासंचालक (न्यायिक व तांत्रिक), महाराष्ट्र राज्य, मुंबई

८. महासमादेशक, गृह रक्षक दल, महाराष्ट्र राज्य, मुंबई
९. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई,
१०. संचालक, उद्योग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
११. अपर पोलीस महासंचालक (नि व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई
१२. अपर पोलीस महासंचालक व संचालक, पोलीस दळण वळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन महाराष्ट्र राज्य, पुणे.
१३. अप्पर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक (कारागृह व सुधारसेवा) महाराष्ट्र राज्य, पुणे.
१४. सर्व पोलीस आयुक्त.
१५. सर्व विशेष पोलीस महानिरीक्षक.
१६. संचालक, न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१७. संचालक, अभियोग संचालनालय, मुंबई.
१८. महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र मुंबई/नागपूर.
१९. सर्व जिल्हा पोलीस अधीक्षक.
२०. सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस गट.
२१. वित्त विभाग (का. व्यय-७), मंत्रालय, मुंबई.
२२. सह सचिव/उप सचिव (सर्व), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
२३. गृह विभाग (सर्व कार्यासने), मंत्रालय, मुंबई.
२४. निवडनस्ती, गृह विभाग/पोल-४.

**शासन निर्णय क्र.पीईक्यू-०११६/प्र.क्र.३३१/पोल-४, दि.०१ जुलै २०२५ सोबतचे विवरणपत्र**

**(संलग्न कागदपत्र/प्रमाणपत्र/आदेश सोबत जोडणे आवश्यक)**

| अ.क्र. | मुद्दा | माहिती |
|---|---|---|
| १ | विभागाचे/घटक कार्यालयाचे नाव | |
| २ | खरेदी करावयाच्या वस्तु व सेवा तसेच यंत्रसामग्री/साधनसामग्री चे नाव व स्वरुप | |
| ३ | संबंधित वापर कर्त्या/घटक कार्यालयास यापुर्वी सदर प्रकारातील वस्तुंचा पुरवठा करण्यात आला असल्यास त्याचा तपशील | |
| ४ | खरेदीविषयक वस्तु व सेवा तसेच यंत्रसामग्री/साधनसामग्री आवश्यकता व उपयुक्तता, संबंधित विभाग प्रमुखांनी प्रमाणित केला आहे काय | |
| ५ | खरेदीविषयक वस्तुच्या किंमतीचा वाजवीपणा संबंधित विभाग प्रमुखांनी तपासला व प्रमाणित केला आहे काय | |
| ६ | खरेदी विषयक बाबींच्या तांत्रिक विनिर्देशांची निश्चिती व पडताळणी **तांत्रिक समितीने** करुन तांत्रिक विनिर्देशासह विभाग प्रमुखांनी प्रमाणित केला आहे काय | |
| ७ | वस्तु एकलस्त्रोताकडून खरेदी करणे आवश्यक असल्यास दि.०१.१२.२०१६ रोजीच्या खरेदी नियम पुस्तिकेमधील नियम ३.२.६ प्रमाणे कार्यवाही करुन खरेदीदार विभाग प्रमुखाने परिशिष्ठ-१३ नुसार विहित नमुन्यातील प्रमाणपत्र सादर केले आहे काय | |
| ८ | खरेदी करावयाच्या वस्तु, सेवा, यंत्रसामग्री/साधनसामग्री प्रति नग किंमत | |
| ९ | खरेदी करावयाच्या वस्तु व सेवा तसेच यंत्रसामग्री/साधनसामग्री एकूण किंमत | |
| १० | प्रस्तावित लेखाशीर्ष व उद्दिष्ठ | |
| ११ | प्रस्तावित लेखाशीर्षामधील चालु आर्थिक वर्षातील अर्थसंकल्पीत निधीचे विवरण | |
| १२ | प्रस्तावित लेखाशीर्षामधील यापुर्वी खरेदी करण्यात आलेल्या वस्तुंवरील प्रलंबित दायित्व असल्यास त्याचा तपशील | |
| १३ | वित्त विभागाच्या दि.१७.०४.२०१५ रोजीच्या शासन निर्णयासोबतच्या वित्तीय अधिकार नियम पुस्तिकेमधील कोणत्या नियमानुसार खरेदी प्रस्ताव शासनास सादर करण्यात आलेला आहे त्याचा तपशील | |
| १४ | प्रस्तावित खरेदीबाबत कार्यालय प्रमुख/विभाग प्रमुख यांचे स्वयंस्पष्ट अभिप्राय | |